तो मुलगा काहीही शोधून काढतो



लेखक : जोआन

मराठी : अश्विनी बर्वे

एक दिवस डेविड तुक्केने अनेक लोकांच्या हरवलेल्या वस्तू शोधून काढल्या. यामुळे सगळ्या शेजाऱ्यामध्ये डेविड प्रसिद्ध झाला. लोकांना वाटते की डेविड त्यांच्या हरवलेल्या वस्तू शोधून काढू शकतो. घरी आल्यावर डेविडने आपल्या आईला आपल्या पराक्रमाबद्दल सांगतो. पण शेवट खूप मजेदार आहे. ही गोष्ट वाचून तुम्हांला खूप-खूप हसू येईल.

तो मुलगा काहीही
शोधून काढू शकतो





डेविड, मिस्टर फ्रैंक्लिन च्या झाडाच्या फांदीवर झुलत होता.



मिस्टर फ्रेंक्लिनी आपल्या टकलावर हात रगडला.
“माझी टोपी कुठे गेली माहीत नाही,” ते म्हणाले.



जेव्हा डेविड फांदीवर जोरात झोका घेत होता,
तेव्हा ती फांदी तुटली. मग डेविड फांदीसहित
जमिनीवर पडला.



त्यानंतर एक वस्तू डेविडच्या मांडीवर पडली.
“ही आपली टोपी आहे का, मिस्टर फ्रेंक्लिन?"
डेविड ने विचारलं.



“हो!" मिस्टर फ्रेंक्लिन म्हणाले.
“ती झाडात अडकली असेल. तू किती हुशार आहे डेविड, तू माझी हरवलेली टोपी शोधून काढली.”



तेव्हाच आपल्या सायकलीवरून लिंडा तिथून जात होती. “तुम्ही म्हटलं की डेविड हरवलेली वस्तू शोधण्यात खूप हुशार आहे?” लिंडाने मिस्टर फ्रेंक्लिनला विचारलं. “हो, तो खरंच स्मार्ट आहे.” मिस्टर फ्रेंक्लिन म्हणाले. “आत्ताच त्याने माझी हरवलेली टोपी शोधून दिली.”



“तू माझ्या बरोबर घरी चल,” लिंडा डेविडला म्हणाली. “कुपा मांजर शोधून काढण्यास मला मदत कर.”



डेविड, लिंडा च्या घरी गेला.
लिंडाचे घर मिस्टर फ्रेंक्लिन च्या घराजवळ होते.



डेविड, लिंडाच्या घरात शिरणार तेवढ्यात तो
एका दगडावरून पाय घसरून पडला आणि
धपकन तोंडावर पडला.





गवतावर पडल्यानंतर ओट्याच्या
खाली त्याला काही गोष्टी दिसल्या.

डेविडने उभं राहून लिंडालं म्हटलं,
“जर तू ओट्याच्या खाली पाहिलं तर
तुला तुझं मांजर आणि तिच्या बरोबर
तिची पिल्लं दिसतील.”



मग लिंडाने पण खाली वाकून बघितलं.
तिनं ओट्याच्या खाली बघितलं. आणि
पटकन उडी मारून उभी राहिली.

"मिस्टर फ्रेंक्लिनी बरोबरच सांगितलं," ती म्हणाली.
“तू खूप हुशार आहेस, डेविड,
तू कोणतीही वस्तू शोधून काढू शकतो!”



तेव्हाच मिसेज़ सांचेज़नी आपल्या स्वयंपाकघराच्या खिडकीतून डोकावून पाहिलं.

"लिंडा, तू म्हणालीस की डेविड काहीही शोधून काढू शकतो?" मिसेज़ सांचेज़नी विचारलं. “तो माझा मसाल्याचा डबा शोधू शकतो?”



डेविड, लिंडाच्या अंगणातून
मिसेज़ सांचेज़च्या स्वयंपाक घरात गेला.

मिसेज़ सांचेज़ कपाटात काही शोधत होती.
“माहीत नाही माझा मसाल्याचा डबा कुठे हरवला,”
तिने डेविडला विचारलं..
"कृपया मला डबा शोधायला मदत कर.”



डेविडला टेबलवर वरणाचं एक मोठं पातेलं ठेवलेलं दिसलं. ते गरम आणि मसालेदार दिसत होतं. वरणाचा मस्त सुगंध सुटला होता.

डेविडने वरणात आपलं बोट बुडवलं आणि मग ते त्यानं चाटलं. मिसेज़ सांचेज़, डेविड कडे बघत होती.





वरणाची चव घेतल्यावर डेविडने आपलं तोंड वाकडं केलं. त्याने जीभ बाहेर काढली, ती थंड करण्याचा प्रयत्न केला.

शेवटी डेविडने एक दीर्घ श्वास घेतला आणि म्हटलं, "मिसेज़ सांचेज़, मला माहीत आहे तुमचा मसाल्याचा डबा कुठे आहे ते?”



“मला वाटतं आपला मसाल्याचा डबा चुकून या पातेल्यात पडला आहे.”

मिसेज़ सांचेज़ने मग लांब चमचा घेवून तो पातेल्यात घातला आणि मसाल्याचा डबा बाहेर काढला.



"लिंडाने बरोबर म्हटलं होतं, डेविड,"
ती म्हणाली.
"तू खरंच हुशार आहे. तू काहीही शोधू शकतो."



मग मिसेज़ सांचेज़ने फोन केला.
"मिस्टर एडम्स!" ती फोनवर ओरडली.
"मी आत्ता, डेविडला तुमच्या घरी पाठवते.
तो काहीही शोधू शकतो. तो नक्कीच तुमचा
हरवलेला दात शोधू काढू शकतो."





मग लॉन ओलांडून डेविड
मिस्टर एडम्सच्या घरी गेला.

मिस्टर एडम्सने मोठ्या मुश्किलिने डेविडला
सांगितले की, त्यांचे नकली दाट कुठेतरी
हरवले आहे.



यानंतर डेविड एका खुर्चीवर बसला. दाट कुठे हरवू शकतात? तो त्यांच्याविषयी खोलात जावून विचार करू लागला..


मग डेविडने उडी मारली आणि तो ओरडला, "बापरे!"



मिस्टर एडम्सचे नकली दात त्याच
खुर्चीवर ठेवलेले होते.



"डेविड!" मिस्टर एडम्सने आपले
दात लावल्या नंतर म्हटलं,
"मिसेज़ सांचेज़ने अगदी बरोबर म्हटलं होतं,
तू खरंच चतुर आहेस, तू कोणतीही वस्तू शोधू
शकतो."



“असा कोण आहे जो कोणतीही वस्तू शोधू शकतो?”
टॉमीने दरवाज्यातून आत येत विचारलं.

“मी कोणतीही हरवलेली गोष्ट शोधू शकतो,”
डेविड म्हटलं.



“मग तू माझ्या बरोबर घरी येशील?”
टॉमीने डेविडला विचारलं.
“आईने मला छोट्या भावाकडे लक्ष ठेवायला सांगितलं होतं. पण आता माझा छोटा भाऊच सापडत नाहीये.”



डेविड, टॉमीच्या घरात जसा घुसला तसं त्यांनं विचारलं, “तू तुझ्या भावाला कुठे-कुठे शोधलं?”



“सगळीकडे," टॉमी म्हणाला.
“घरात आणि बाहेर सुद्धा.”



“मी सोफ्यावर बसून विचार करतो, की तुझा लहान भाऊ
शेवटी कुठं गेला असू शकेल?” डेविड म्हणाला.

त्यानंतर डेविड सोफ्यावर जोरात बसला,
तेव्हा त्यातून आवाज आला.



डेविडला सोफ्याच्या खालून एक विचित्र आवाज आला.

त्यानंतर डेविड उभा राहिला आणि त्याने टॉमीला म्हटलं, “जर सोफ्याच्च्या खाली पाहिलं तर तिथं तुला तुझा छोटा भाऊ लपलेला दिसेल.”



त्यानंतर टॉमी सोफ्याच्या खाली गेला आणि त्याने त्याच्या छोट्या भावाला खेचून बाहेर काढलं.



"मिस्टर एडम्सने खरंच बरोबर म्हटलं होतं डेविड!“ टॉमी म्हणाला. “तू खरंच खूप सक्षम आहे, तू कोणतीही वस्तू शोधू शकतो.”



तेव्हाच टॉमीचे वडील मिस्टर ग्रीनली घाईने घरात घुसले. ते जोर-जोरात आपली ब्रीफकेस हलवत होते.

“काय मी हे ऐकलं का की डेविड कोणतीही वस्तू शोधून काढू शकतो? ”त्यांनी म्हटलं. “तू माझं भाषण शोधू शकतो काय? माझं भाषण ब्रीफकेस मध्ये नाही.”





मिस्टर ग्रीनली यांनी आपली ब्रीफकेस
एवढ्या जोरात हलवली की
डेविडचा पुस्तकांच्या मांडणीला धक्का लागला.

धक्का लागल्याने पुस्तकाची मांडणी हलली
आणि त्यातून एक पुस्तक खाली पडलं.




डेविडने पडणाऱ्या पुस्तकाला पकडण्याचा प्रयत्न केला,पण पुस्तकाच्या जागी त्याच्या हातात काही पानं लागली.



“हे माझं भाषण आहे!” मिस्टर ग्रीनली ओरडले. “मी माझं भाषण डिक्शनरी मध्ये ठेवलं आणि विसरून गेलो होतो. तू खूप हुशार आहे की काहीही शोधू शकतो.”



डेविड, टॉमीच्या घरातून निघाला.
त्याने मिस्टर ग्रीनलीला त्यांच्या कारकडे घाईनं
जातांना पाहिलं.



त्यानंतर डेविड पळत-पळत घरी गेला.

“आई!" तो ओरडला.


“आई मला तुझ्याशी बोलायचं आहे.”

“तू मला काही सांगायच्या आधी,” डेविडची आई म्हणाली, “तू तुझ्या चपला जागेवर ठेव.”



“कोणते बूट?” डेविडने विचारलं.

“जे तुझ्या नाकासमोर पडलेले आहेत,” आई म्हणाली.
“तेच जे तू हरवले होते.”



मग आईने डेविडला एक कागद दिला,
“हा तुझ्या होमवर्क, जो तुला सकाळपासून
सापडत नव्हता.”

“आणि हा तुझा फुटबॉल, जो तू बैचेन होवून
शोधत होता. तो तू जेवणाच्या टेबलावर
ठेवून विसरून गेला होता.



"अच्छा, आता सांग," आईनं विचारलं,
"तू मला काय सांगणार होता?"



डेविडने आईला आनंदानं सांगू लागला,
"मला तुला सांगावं वाटतं की शेजारचे लोक समजतात की, मी खूप हुशार आहे, आणि कोणतीही गोष्ट शोधू शकतो."



त्यानंतर आई खूप वेळ हसत राहिली. डेविडला समजलं नाही की आई का हसत आहे ते.

समाप्त